## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) सहा. पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांचेकडून दि.२१/०७/२०१२ रोजी प्राप्त पत्र व त्यानंतर दिनांक ०६/०९/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६४/२०११/जा.६४६, दिनांक १२/०९/२०१२, ०३/१०/२०१२, ११/१०/२०१२ व ०३/११/२०१२.

३) टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ तथा मे. एस. आर. रोडलाईन्सचे मालक व शाम अयोध्या यादव यांचे दिनांक ०३/१०/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

४) दिनांक १०/१०/२०१२ रोजी मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स् प्रा.लि. व मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज या कंपनीच्या वतीने प्राप्त कागदपत्रे

५) या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६४/२०१२/जा.७१९ दिनांक ११/१०/२०१२.

६) मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांचे दिनांक २०/११/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

७) मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांचे दि.०१/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

८) सहा. पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांचेकडून दि.०५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त पत्रासोबतची रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६४/२०१२/जा.१७०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक : ०४/०३/२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ११/०७/२०१२ रोजी गुन्हे कक्ष १, कार्यालय वाशी, नवी मुंबई येथील सपोनि श्री. जी.डी. पवार, पोहवा/६८० लाडकर, पोहवा/९९४ काझी, पोहवा/१५०३ पवार, पोहवा/१९ राऊत, पोना/१३३७ पाटील, पोना/११८२ शिंदे, पोना/२६१२ इंगुळकर, पोशि/५६३ चव्हाण यांना सहा. पोलिस आयुक्त गुन्हे शाखा यांचे कार्यालय, सीबीडी बेलापुर, तुर्भे, नवी मुंबई या ठिकाणी बोलावून सहा. पोलिस आयुक्त श्री. सुरेश पवार यांनी अशी माहिती दिली की, सहा. पो. निरी. श्री. पवार यांना गुप्त बातमीदारामार्फत अशी माहिती मिळाली आहे की, बगाडे कंपनीच्या पाठीमागे, राज हॉटेल रोड, तुर्भे एमआयडीसीमधील सर्व्हिस रोड, नवी मुंबई याठिकाणी सायंकाळी अंधार पडण्याच्या सुमारास अवैधपणे ऑईल केमिकल खरेदी करणाऱ्या इसमाकडे काही टँकर हे ऑईल,

केमिकल हे चोरीने विक्रीसाठी येणार आहेत. सदर ठिकाणी साध्या वेशात सापळा रचुन कारवाई करणे असलेबाबत माहिती दिली.

उपरोक्त पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांचे पथक पंचासह स.पो.आ. गुन्हे शाखा श्री. सुरेश पवार यांच्या नेतृत्वाखाली खाज़गी वाहनाने दिनांक ११/०७/२०१२ रोजी २२:४५ वाजता सर्च लाईट व लॅपटॉपसह रवाना झाले. सदर वाहनाने प्रवास करुन पोलिस पथक व पंच असे २३:०० वाजता बगाडे कंपनीच्या पाठीमागे, राज हॉटेल रोड, तुर्भे एमआयडीसी मधील सर्व्हिस रोड, तुर्भे, नवी मुंबई येथे पोहचले. सदर ठिकाणी स.पो.आ. गुन्हे शाखा श्री. सुरेश पवार यांनी नमूद पथकाचे दोन पथकामध्ये विभागणी केली. स.पो.आ. गुन्हे शाखा श्री. सुरेश पवार व पोहवा/६८० लाडकर, पोहवा/९९४ काझी, पोहवा/१५०३ पवार, पंच श्री. रामजी रामनारायण यादव व दुसरे पथकामध्ये सपोनि/पवार व पोहवा/१९ राऊत, पोना/१३३७ पाटील, पोना/११८२ शिंदे, पोना/२६१२ इंगुळकर, पोशि/५६३ चव्हाण, पंच श्री. बळीराम दयाराम यादव असे नेमण्यात आले. सदर पहिले पथक हे राज हॉटेलच्या आडोशाला दिसणार नाहीत असे दबा धरुन बसले व दुसरे पथक हे वाहनात बसून रोडचे पुर्व बाजूस असलेल्या दुसऱ्या सर्व्हिस रोडवर जाऊन दबा धरुन थांबले असता सर्व्हिस रोडवर वळणाचे ठिकाणी दोन लोखंडी ड्रम ठेवलेले दिसले. सदर ठिकाणी एक इसम घुटमळत असताना दिसला. सुमारे २३:१५ वाजता टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ यामधून त्याचा चालक खाली उतरला व ड्रम शेजारी घुटमळणारे इसमाशी बोलचाल सुरु केली व सदर ट्रकमधून आणखी एक इसम खाली उतरला. तो ट्रकच्या पाठीमागील टाकीचे वर चढून बसला. त्यावेळी सदर ठिकाणी घुटमळणाऱ्या इसमाने ड्रम शेजारी असलेला पाईप ट्रकचे पाठीवर बसलेल्या इसमाचे हातात दिला व सदर इसमाने टाकीचे झाकण उघडून त्यामध्ये पाईप टाकला. घुटमळणाऱ्या इसमाने पाईपचे दुसरे टोक खाली ठेवलेल्या बॅरलमध्ये सोडले. सदर प्रकार पाहून पोलिस पथकाची प्राप्त गुप्त बातमीची खात्री झाल्याने सुमारे २३:४५ वाजता सपोआ श्री. सुरेश पवार यांच्या आदेशाने सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी अंधाराचा फायदा घेऊन त्यामधील एक इसम हा पळून गेला. पोलिस पथकाने एकूण दोन इसमांना ताब्यात घेतले व त्यांची पंचासमक्ष विचारणा करता, सदर ठिकाणी घुटमळणाऱ्या इसमाने त्याचे नाव शाम अयोध्या यादव असे सांगितले. तसेच ट्रकचे टाकीवर चढलेल्या इसमाने त्याचे नाव नवनाथ बाबुराव वाघमोडे असल्याचे सांगितले.

उपरोक्त इसमापैकी शाम अयोध्या यादव याने अधिक माहितीत तो हेक्झेन (फुडग्रेन) नावाचे द्रव टँकर चालकाकडून विकत घेतात व वाहनातील पेट्रोलमध्ये भेसळ करण्यासाठी वाहन चालकांना विकत असतात, असे सांगितले. त्यानंतर ट्रकचे टाकीवर चढलेला इसम नवनाथ बाबुराव वाघमोडे याने अधिक माहितीत तो मोटार ट्रक क्र. एमएच-४३-वाय-०५५९ याचा क्लिनर असल्याचे सांगून त्याचा चालक सुरेश पाटील असे दोघे मिळून अधिक पैशासाठी ट्रकमधील द्रव चोरीने विकत असतो, असे सांगितले व सुरेश पाटील हा पोलिसांना पाहून पळून गेला आहे. पोलिस अधिकाऱ्यांनी सदर ट्रकची पंचांसमक्ष झडती घेतली असता, त्यामध्ये चालकाचे स्ट्रेरिंग समोरील डॅश बोर्डवर भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई यांचे लेटर हेडवर शिप पार्टीचे नाव

0003

पिडीलाईट इंडस्ट्रिज लि., मुंबई नमूद असलेले व सोल्ड पार्टी म्हणून पॅरामाऊंट ॲडेझीव्ह ॲप्स प्रा.लि. प्लॉट नं. ४८०२/२, जीआयडीसी, बलसाड, गुजरात यांचेसाठी असलेली इन्व्हाईस नोट दोन प्रतीत व इतर पावत्या मिळून आल्या. त्यामध्ये हेक्झेन नावाचा द्रवपदार्थ असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदरचे कागदपत्रांवरुन द्रवपदार्थाची अधिक खात्री करण्याकरिता जीवनावश्यक वस्तू पुरवठा अधिकारी वाशी विभाग येथे संपर्क झाला नाही. तसेच भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. येथेही संपर्क झाला नाही. तसेच पुराव्याकामी घटनास्थळाचे फोटो काढण्याकरिता खाजगी फोटोग्राफर आणण्याकरीता पोना/२६१२ इंगुळकर यांना सुचना देऊन रवाना केले. एकंदरीत वरील मिळून आलेले व पळून गेलेले इसमांनी जीवनावश्यक वस्तू कायद्याप्रमाणे गुन्हा केल्याचे स्पष्ट झाल्याने पुढील कार्यवाहीकरीता सदर दोन्ही इसमांना ताब्यात घेण्यात आले. तसेच त्यांचेकडे सदर ठिकाणी मिळून आलेली आक्षेपार्ह वाहने व द्रवपदार्थ हे तपासकामी जप्त करण्यात आले.

अशाप्रकारे दिनांक ११/०७/२०१२ रोजी २३:४५ वाजता बगाडे कंपनीच्या पाठीमागे, राज हॉटेल रोड, तुर्भे एमआयडीसी मधील सर्व्हिस रोड, तुर्भे, नवी मुंबई येथे शाम अयोध्या यादव, नवनाथ बाबुराव वाघमोडे व पळून गेलेला ट्रक चालक सुरेंद्र पाटील यांनी त्यांच्या ताब्यातील वरील ट्रकचे सिल बेकायदेशिरपणे तोडून हेक्झेन द्रव हे भेसळ करण्यासाठी देत असताना मिळून आले. तसेच आरोपीतांनी संगणमताने संबंधित कंपनीतून भरलेला माल विहित कंपन्यांना न पोहचवता परस्पर वरील ठिकाणी मालाची भेसळ करण्यासाठी विक्री करुन संबंधित कंपन्यांचा विश्वासघात केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द, १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४०७ व ३४ चा भंग केल्यावरुन तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. I २२३/२०१२, दिनांक १२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठ्यामधून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टॅंकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ | १ नग | १२,००,०००/- |
| २ | उक्त टॅंकरमध्ये अंदाजे १३ टन हेक्झन नावाचे द्रव टॅंकरमध्ये मिळालेल्या कागदपत्रानुसार | १३ टन | १,२९,०००/- |
| ३ | दोन ड्रम त्यातील एका ड्रममध्ये अंदाजे २०० लिटर हेक्झन नावाचे द्रव व दुसऱ्या ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर हेक्झन नावाचे द्रव व एक हिरव्या रंगाचा प्लास्टिक दोन इंची व्यासाचा अंदाजे १५ फुट लांबीचा पाईप | - | ५,५००/- |
| | | एकूण | १३,३४,५००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती सहा. पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून,

जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०३/१०/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ तथा मे. एस. आर. रोडलाईन्सचे मालक तसेच त्यांच्या वतीने ॲड. श्री. नरेश प्रधान हे वकालतनाम्यासह व शाम अयोध्या यादव यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तसेच टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ चा चालक सुरेश पाटील व क्लिनर नवनाथ बाबुराव वाघमोडे हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. तथापी, नमूद टँकरमधून सुमारे २०० लिटरचा साठा हा त्यांनी रुपये ३,०००/- घेऊन श्याम अयोध्या यादव यास विकल्याचे कबूल केले. सदर सुनावणीस उपस्थित ॲड. श्री. नरेश प्रधान यांनी सदर साठ्याचे मालक मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. असल्याचे सांगून सदर कंपनीने त्यांचे अशिल असलेल्या वाहतूकदारास साठा परत घेण्यास प्राधिकृत केल्याचे पत्र सादर केले. तथापी, सदरचा साठा हा सॉल्वंट आदेशान्वये नोटीफाईड असल्याने साठा मालकास सदरचा साठा धारण करण्यासाठी दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) (अनुज्ञापन) ऑर्डर २००७ अन्वये जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत परवानाची गरज असल्याने कंपनीच्या नावे असलेला परवाना सादर करण्यास सुचित केले असता, उपस्थित वकीलाने याबाबत पुर्तता करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी व साठा मालक उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १०/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री. नरेश प्रधान यांनी उपस्थित राहून मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीने त्यांच्या वतीने त्यांना सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी प्राधिकृत केल्याचे सांगून सदर बाबतचे प्राधिकारपत्र यापूर्वी दिनांक ०३/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस सादर केल्याचे सांगितले. तथापी, सदर पत्राचे अवलोकन करता ते प्राधिकारपत्र नसून मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांनी मे. एस.आर. रोडलाईन्सचे मालक सुनील आर. पाटील यांना साठा सुपूर्द करण्यास विनंती केल्याचे नमूद आहे. सदर सुनावणीच्या वेळी ॲड. श्री. नरेश प्रधान यांनी मे. पॅरामाऊंट ॲडेसीव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीच्या नावे असलेले अनुज्ञप्ती क्र. १२४ दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत विधीग्राह्य असलेले जिल्हा न्याय दंडाधिकारी, वलसाड (गुजरात राज्य) यांनी निर्गमित केलेल्या सॉल्वंट अनुज्ञप्तीची छायांकित प्रत सादर केली. परंतू सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. बी.पी.सी.एल. लिमिटेड या कंपनीचे प्राप्त चलनाचे अवलोकन करता, सदर हेक्झेनचा साठा मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांनी संबंधित तेल कंपनीकडून खरेदी केलेला असल्याचे तसेच सदरचा साठा त्यांनी मे. पॅरामाऊंट ॲडेसीव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीस वितरण केल्याचे दिसून येते. सबब, सदर प्रकरणी मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीकडे सॉल्वंटच्या संपादन,

साठवणूक व वापर करण्यासाठी अनुज्ञप्ती आहे किंवा कसे ? तसेच सदरचा साठा हा मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांनी खरेदी केला असताना मे. पॅरामाऊंट ॲडेसीव्ह टेप्स प्रा.लि. हि कंपनी जप्त साठ्याची मागणी करीत असल्याने या प्रकरणी अधिक खातरजमा करण्यासाठी नमूद दोन्ही कंपन्यांचे प्रतिनिधी/संचालक यांना पुरावादर्शक कागदपत्रांसह त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक ३०/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आली. तसेच इतर राज्यातील सॉल्वंट परवानाधारक हे संबधित राज्यातुन साठयाची उचल न करता मुंबई, महाराष्ट्र येथुन उचल करण्याचे प्रयोजन काय ? याबाबतचा अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी मे. बीपीसीएल कंपनीस पत्र निर्गमित करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी, घटनास्थळी पोलिस पथकाने टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ मधून जप्त केलेल्या कागदपत्रांमध्ये मे. बी.पी.सी.एल. या कंपनीचे इन्व्हाईस क्र. १२३९४३ ची छायांकित प्रत ताब्यात घेतली आहे. सदर इन्व्हाईसचे अवलोकन करता, दिनांक ११/०७/२०१२ रोजी टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ या टँकरमधून २० किलो लिटर हेक्झेनचा साठा मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीस वितरीत केल्याचे दिसून येते. तथापी, सदर चलनामध्ये नमूद तेल कंपनीने सदरचा साठा मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. यांना विक्री केल्याचे दिसुन येते. दिनांक १०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीच्या नावे डिस्ट्रीक मॅजिस्ट्रेट, वलसाड, गुजरात राज्य यांनी निर्गमित केलेल्या सॉल्वंट अनुज्ञप्ती क्र. १२४ ची छायांकित प्रत वाहतूकदाराच्या वकिलामार्फत सादर करण्यात आली आहे. मे. बी.पी.सी.एल. या कंपनीचे गुजरात राज्यातही टर्मिनल असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. परंतू या प्रकरणी गुजरात राज्याच्या सॉल्वंट अनुज्ञप्तीच्या आधारे मुंबई येथील टर्मिनलमधून हेक्झेनचा साठा खरेदी करण्याचे प्रयोजन काय ? याचे बोध होत नाही. मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., ट्रॉम्बे डिस्पॅच युनिट, मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई ७४ या कंपनीकडून सदर साठ्याचे पुरवठा करताना दोन्ही नमूद कंपन्यांपैकी कोणत्या कंपनीने सदर साठ्याच्या साठवणूक व वापर करण्याकरिता आवश्यक असणारा सॉल्वंटचा परवाना सादर केला. याबाबतचा परिपूर्ण अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करण्यासाठी तसेच जप्त असलेल्या हेक्झेन या ज्वलनशिल सॉल्वंट साठ्याच्या विल्हेवाटीबाबत अंतीम निर्णय घेणे सुलभ होण्याकरिता या कार्यालयाचे वाचावे क्र. ४ अन्वये मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., ट्रॉम्बे डिस्पॅच युनिट, मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई ७४ यांना तसेच त्याची प्रत राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी ड़िमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई - ४०० ०१० व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांना निर्गमित करण्यात आली.

दिनांक ३०/१०/२०१२ रोजीच्या सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील अंतीम सुनावणी २०/११/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या अंतीम सुनावणीस मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांचे वतीने चिफ मॅनेजर श्रीरंग पांगारकर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ५ अन्वये लेखी निवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे.

पॅरामाऊंट अधेसीव्ह टेप्स प्रा.लि. यांचे वतीने डायरेक्टर कमलेश वासवाणी हे उपस्थित राहिले. तथापी, त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही.

मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. चे एरिया मॅनेजर यांनी वाचावे क्र. ७ अन्वये सादर केलेल्या अहवालात, मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांनी टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ या टँकरमधून २० किलो लिटर हेक्झेनचा खरेदी केलेला साठा मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीस दिनांक ११/०७/२०१२ रोजी इन्व्हाईस क्र. ६१००२७४१८३ अन्वये वितरीत केला आहे. सदरचा साठा हा मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज यांनी दिलेल्या मागणीपत्रास अधिन राहुन तसेच मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह टेप्स् प्रा.लि. यांच्या नांवे असलेल्या सॉल्वंटच्या वैध परवानानुसार वितरण केल्याचे नमुद केले आहे.

तद्नंतर वाचावे क्र. ८ अन्वये सहा. पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांचेकडून दि.०५/०२/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त पत्रासोबतच्या रासायनिक पृथ:करण अहवालाच्या छायांकित प्रतीत, Hexane is detected in exhibit Nos. 1 to 3, असे नमूद आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखुन ठेवण्यात आले.

<u>युक्तीवाद</u> :-

दिनांक ०३/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ तथा मे. एस. आर. रोडलाईन्सचे मालक यांनी युक्तीवाद केला की, सदरचे टँकर त्यांच्या मालकीचे असुन टँकरमधील हेक्झेन या केमीकलचा साठा मे. पॅरामाउंट अधेसीव्ह प्रा.लि. या कंपनीने मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांच्या अकाऊंटवर मे. बीपीसीएल लि. या कंपनीकडून दि. १०/०७/२०१२ रोजी खरेदी केलेला आहे. सदर प्रकरणी ते वाहतुकदार असुन टँकरमधील साठा हा शिवडी मुंबई येथील सरग्राम, गुजरात येथे वाहतुकीसाठी भरला होता. त्यांच्या टँकरचालकाने त्यांना अवगत न करता टँकरच्या वाहतुकीचे नियोजीत मार्ग बदलुन सदरचा टँकर नवी मुंबई येथे आणुन शाम यादव यास टँकरमधील साठयाचे विक्री करीत असतांना पोलिसांनी धाड टाकुन टँकरचालकास अटक करुन त्यांचा टँकर त्यामधील केमीकल साठयासहीत जप्त केल्याचे नमुद केले. सदर गुन्ह्यामध्ये त्यांचा कोणताही सहभाग नसुन चालकाने त्यांच्या अपरोक्ष टँकरमधील साठयाचा गैरव्यवहार केला असल्याने त्यांचा टँकर व त्यामधील साठा हा योग्य अटी व शर्तीवर त्यांच्या ताब्यात देण्यात यावा असे नमुद करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०३/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित शाम अयोध्या यादव यांनी युक्तीवाद केला की, टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ मध्ये अंदाजे १३ टन व २०० लिटर क्षमतेच्या दोन ड्रममधील हेक्झन नावाचे द्रव यातील कुठल्याही मालाशी त्याचा कसलाही संबंध नाही. तरी सदर मालाबाबत आपण योग्य तो आदेश करावा, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांचे वतीने चिफ मॅनेजर श्रीरंग पांगारकर यांनी युक्तीवाद केला की, मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीच्या अधिपत्याखाली मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह टेप्स् प्रा.लि. ही कंपनी जॉब वर्कर म्हणुन काम करीत आहे. मे. पिडीलाईट ही कंपनी मे. पॅरामाऊंट या कंपनीस रॉ मटेरियलचा पुरवठा करुन त्यांच्याकडून कंपनीचा उत्पादन करुन घेत आहे. दोन्ही कंपन्यांचा कॉन्ट्रॅक्ट ॲग्रिमेंट सोबत अवलोकनार्थ जोडला आहे. मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज या कंपनीने मे. भारत पेट्रोलियम मुंबई या कंपनीकडून हेक्झेनचा साठा खरेदी करुन तो मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह प्रा.लि. यांना पुरवठा केला आहे. सदर हेक्झेनचा साठा हा त्यांच्या कंपनीच्या अंतीम उत्पादित साठयाकरीता रॉ मटेरियल म्हणुन वापर करीत आहे. सदरचा साठा मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह प्रा.लि. ही कंपनी त्यांच्या जीआयडीसी, सारीग्राम, गुजरात या ठिकाणी असलेल्या फॅक्टरीमध्ये उत्पादनासाठी वापर करीत असुन त्याकरीता मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह प्रा.लि. या कंपनीकडे नमुद फॅक्टरीच्या पत्यावर दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला सॉल्वंट परवाना क्र. १२४ आहे. उपरोक्त कागदपत्रांचे अवलोकन करुन जप्त टँकरमधील साठा त्यांना लवकरात लवकर परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ११/०७/२०१२ रोजी गुन्हे कक्ष १, कार्यालय वाशी, नवी मुंबई यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार तेथील पोलिस पथकाने बगाडे कंपनीच्या पाठीमागे, राज हॉटेल रोड, तुर्भे एमआयडीसी मधील सर्व्हिस रोड, तुर्भे, नवी मुंबई येथे धाड टाकली असता, शाम अयोध्या यादव, नवनाथ बाबुराव वाघमोडे व पळून गेलेला ट्रक चालक सुरेंद्र पाटील यांनी त्यांच्या ताब्यातील टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ चे सिल बेकायदेशिरपणे तोडून हेक्झेन या सॉल्वंट द्रवपदार्थाचा साठा हा भेसळ करण्यासाठी देत असताना मिळून आल्याने संबंधिताविरुध्द गुन्हा नोंद करुन वरील ट्रक व त्यामधील हेक्झेन नावाचे द्रवपदार्थ व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ चे कलम ३ अन्वये अनुज्ञप्तीशिवाय संपादन, साठवण, विक्री, वापर किंवा विक्रीसाठी साठवण करण्यास मनाई आहे, असे नमूद असून <u>कलम ३ (ब)</u> नुसार कोणतीही व्यक्ती तिने सॉल्वंटस्, रॅफिनेट व स्लॉप यांचे संपादन, साठवण, विक्री, वापर किंवा विक्रीसाठी साठवण करण्यासाठी या आदेशान्वये अनुज्ञप्ती प्राप्त केलेली असल्याखेरीज अनुसुची १ मध्ये समाविष्ठ असलेले सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप याची अन्य राज्यातून किंवा देशातून महाराष्ट्र राज्यात आयात करणार नाही व <u>कलम ३</u>

(क) अन्वये कोणतीही व्यक्ती, तेल कंपनीकडून किंवा अनुज्ञप्तीधारकाकडून असेल त्याव्यतिरिक्त सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप संपादन करणार नाही किंवा अनुज्ञप्तीधारक किंवा नोंदणीकृत ग्राहक यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीस सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप यांची विक्री करणार नाही तसेच कलम ३ (फ) अन्वये कोणतीही व्यक्ती, अनुज्ञप्तीधारक, तेल कंपनी किंवा अन्य कोणीही, अनुसुची-एक मध्ये समाविष्ठ असलेले सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप याची अनुज्ञप्तीधारक किंवा नोंदणीकृत उपभोक्ता यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस विक्री करणार नाही, असे नमूद आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि., मुंबई या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीच्या नावे सॉल्वंटचा परवाना नसून नमूद गुन्ह्यातील जप्त टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ मधील हेक्झेन या सॉल्वंट पदार्थाच्या यादीमध्ये समाविष्ठ असलेला साठा त्यांच्या कंपनीने मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीकडून खरेदी केला असून सदरचा साठा त्यांनी मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. या जॉब वर्कर कंपनीस त्यांच्या उत्पादनासाठी वितरीत केला असल्याचे सांगितले आहे. त्याअनुषंगाने मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीस या कार्यालयाकडून पत्र निर्गमित करुन सॉल्वंट अनुज्ञप्तीधारक नसलेली मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. या कंपनीस हेक्झेन या सॉल्वंटच्या साठ्याची विक्री कशी केली ? अथवा मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीकडील गुजरात राज्यातील सॉल्वंट परवानावर मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीने हेक्झेन हा सॉल्वंटचा साठा कसा खरेदी केला ? याबाबत विचारणा करुन अहवाल सादर करण्यास सुचित करण्यात आले. मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांचेकडून प्राप्त अहवालात, त्यांनी टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ मध्ये इन्व्हाईस क्र. ६१००२७४१८३ अन्वये दिनांक ११/०७/२०१२ रोजी २० किलो लिटर हेक्झेन या सॉल्वंट साठयाचा पुरवठा मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. या कंपनीकरिता केला आहे. मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. या कंपनीने त्यांचेकडे सादर केलेल्या मागणी पत्रानुसार त्यांनी मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. यांचे नावे असलेल्या सॉल्वंट व विस्फोटक परवानाच्या अनुषंगाने साठ्याचा पुरवठा केल्याचे नमूद केले. तथापी, त्यांनी मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. यांच्याकडे सॉल्वंटचा परवाना नसताना त्यांना सॉल्वंट साठ्याची विक्री कशी केली, याबाबत काहीच भाष्य केले नाही. ही आश्चर्यजनक बाब आहे.

उपरोक्त कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. बी.पी.सी.एल. या कंपनीने मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. या कंपनीच्या नावे सॉल्वंटचा परवाना नसताना केवळ त्यांनी केलेल्या मागणी व पेमेंट नुसार मे. पॅरामाऊंट अधेसिव्ह टेप्स प्रा.लि. यांचे नावे असलेल्या सॉल्वंट व विस्फोटक परवानाच्या अनुषंगाने साठ्याचा पुरवठा केल्याचे स्पष्ट होत आहे. वास्तविक पहाता महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ चे कलम ३ अन्वये अनुज्ञप्तीशिवाय संपादन, साठवण, विक्री, वापर किंवा विक्रीसाठी साठवण करण्यास मनाई आहे तसेच कलम ३ (फ) अन्वये कोणतीही व्यक्ती, अनुज्ञप्तीधारक, तेल कंपनी किंवा अन्य कोणीही, अनुसुची-एक मध्ये समाविष्ठ

असलेले सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप याची अनुज्ञप्तीधारक किंवा नोंदणीकृत उपभोक्ता यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस विक्री करणार नाही, असे स्पष्ट नमूद असतांनाही मे. बीपीसीएल या तेल कंपनीने मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीने हेक्झेन या सॉल्वंट पदार्थाच्या संपादन, साठवण, विक्री किंवा वापर यासाठी सॉल्वंटचा परवाना धारण केले नसतांनाही पुरवठा केल्याचे सिध्द होते. मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीची फॅक्टरी गुजरात या राज्यात असुन सदर कंपनी मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांच्या अधिपत्याखाली जॉब वर्कर म्हणुन काम करीत असून सदर कंपनीकडे गुजरात राज्यातील सॉल्वंटचा परवाना आहे. मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय मुंबईत असुन सदर सॉल्वंटचा साठा त्यांनी मे. बीपीसीएल या तेल कंपनीच्या मुंबई येथील रिफायनरीमधुन खरेदी केल्याचे दिसुन येते. मे. पिडीलाईट इंडस्ट्रीज लि. यांनी महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ चे कलम ३ अन्वये सॉल्वंट परवाना धारण करणे आवश्यक असतांनाही त्यांनी मे. पॅरामाऊंट अधेसीव्ह टेप्स प्रा.लि. या कंपनीच्या नावे असलेला गुजरात राज्यातील सॉल्वंटचा परवाना सादर करुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे. मे. बीपीसीएल ही केंद्र सरकारची अंगिकृत असलेली उपक्रम कंपनी असुन सदर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सॉल्वंट या अनुसुचित साठयाची विक्री करतांना त्यांच्या कंपनीकडे मागणी करणारी कंपनी सॉल्वंटचा परवाना धारण करीत आहे किंवा कसे ? याची खातरजमा करण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची असुन सदर प्रकरणी मे. बीपीसीएलच्या अधिकाऱ्यांनी हेक्झेन या अनुसुचित वस्तुचा साठा मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीकडे सॉल्वंटचा परवाना नसतांनाही सदर कंपनीस सॉल्वंटची विक्री करुन त्यांना नेमुन दिलेल्या जबाबदारीमध्ये अक्षम्य निष्काळजीपणा दाखविला असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. या कंपनीने मे. बिपीसीएल या तेल कंपनीकडून हेक्झेन या सॉल्वंटचा साठा विनापरवाना खरेदी केल्याचे निष्पन्न होत असल्याने त्यांनी महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, नमूद गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला टॅंकरमधील संपूर्ण हेक्झेन या सॉल्वंटचा विनापरवाना खरेदी केलेला साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सदर गुन्हयातील जप्त टॅंकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ तथा मे. एस. आर. रोडलाईन्सचे मालक यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, सदरचे टॅंकर त्यांच्या मालकीचे असुन टॅंकरमधील हेक्झेन या केमीकलचा साठा मे. पॅरामाउंट अधेसीव्ह प्रा.लि. या कंपनीने मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि. यांच्या अकाऊंटवर मे. बीपीसीएल लि. या कंपनीकडून खरेदी केल्याचे सांगुन सदर प्रकरणी ते वाहतुकदार असुन टॅंकरमधील साठा हा शिवडी मुंबई येथुन सरग्राम, गुजरात येथे वाहतुकीसाठी भरला होता. त्यांच्या टॅंकरचालकाने त्यांना अवगत न करता टॅंकरच्या वाहतुकीचे नियोजीत मार्ग बदलुन सदरचा टॅंकर नवी मुंबई येथे आणुन शाम यादव यास टॅंकरमधील साठयाचे

विक्री करीत असतांना पोलिसांनी धाड टाकुन टँकरचालकास अटक करुन त्यांचा टँकर त्यामधील केमीकल साठयासहीत जप्त केल्याचे नमुद केले. सदर गुन्ह्यामध्ये त्यांचा कोणताही सहभाग नसुन चालकाने त्यांच्या अपरोक्ष टँकरमधील साठयाचा गैरव्यवहार केला असल्याने त्यांचा टँकर व त्यामधील साठा हा योग्य अटी व शर्तीवर त्यांच्या ताब्यात देण्यात यावा असे सांगितले.

तथापी, नमुद टँकरचे चालक/क्लिनर हे नियोजीत ठिकाणी न जाता अनधिकृत ठिकाणी टँकर नेवून तेथील गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांशी संगनमत करुन त्यांच्या ताब्यात असलेल्या टँकरमधील साठा काढून गैरमार्गाने खुलेआम विक्री करीत असल्याचे दिसुन येते. सदर गैरप्रवृत्तीस आळा घालण्याची जबाबदारी टँकरचे मालक अथवा वाहतुकदाराची आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी टँकरचे मालक अथवा वाहतुकदार यांनी त्यांचा या गैरप्रवृत्तीशी काहीही संबंध नसल्याचे सांगुन त्यांनी या कार्यालयाची दिशाभूल करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते. नमुद टँकरमधील भरण्यात आलेला हेक्झेनचा साठा हा नियोजीत ठिकाणी व जसाच तसा वितरण करण्याची जबाबदारी वाहतुकदार व टँकरचे मालक यांची आहे. वास्तविक पाहता टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ या टँकरच्या चालकाने सदरचा साठा भरुन नियोजित ठिकाणी न जाता घटनास्थळी जाऊन नमूद टँकरमधील हेक्झेनचा साठा हा इतर इसमांच्या संगणमताने अनधिकृतरित्या काढीत असतांना पथकाने रंगेहात पकडले आहे. या सर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, टँकर मालक यानी वाहतूकीची जबाबदारी पार पाडताना अक्षम्य निष्काळजीपणा दाखवून फक्त टँकर चालकास जबाबदार धरले आहे. टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ मधील हेक्झेनचा साठा प्रत्यक्षात उपभोक्त्यास न देता स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी गैरमार्गाने सदर टँकरमधील हेक्झेनचा साठा टँकर चालकाने काढल्याचे आढळून आल्याने या गैरकृत्यास अप्रत्यक्षरित्या टँकर मालक हेही जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. प्रस्तुत प्रकरणी टँकर मालकांच्या अपरोक्ष जरी चालक यांनी त्यांचे वाहनांचा गैरवापर केला असला तरी वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर टँकरच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास टँकरचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा टँकर त्याच्या मालकास परत करण्याचा अथवा टँकरचा मालक तेवढी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरचा टँकर जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी जप्त करण्यात आलेले दोन ड्रम त्यातील एका ड्रममध्ये अंदाजे २०० लिटर हेक्झन नावाचे द्रव व दुसऱ्या ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर हेक्झन नावाचे द्रव व एक हिरव्या रंगाचा प्लास्टिक दोन इंची व्यासाचा अंदाजे १५ फुट लांबीचा पाईप इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.



CONTROLLER OF RATION

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये तुर्भे पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. I २२३/२०१२, दिनांक १२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, ज़प्त करण्यात आलेल्या मोटार टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ या टँकरमधील संपुर्ण हेक्झेनचा साठा हा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासनजमा करण्यात आलेला हेक्झेनचा साठा पोलिसांनी राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना प्रचलीत दराने विक्री करुन त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनाच्या बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनाचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहन त्याच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनाच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनाचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनाची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहन लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले दोन ड्रम त्यातील एका ड्रममध्ये अंदाजे २०० लिटर हेक्झन नावाचे द्रव व दुसऱ्या ड्रममध्ये अंदाजे ५० लिटर हेक्झन नावाचे द्रव असे मिळून एकुण २५० लिटर हेक्झेन हा सॉल्वंटचा साठा हा शासनजमा करण्यात यावा. सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले एक हिरव्या रंगाचा प्लास्टिक दोन इंची व्यासाचा अंदाजे १५ फुट लांबीचा पाईप व उक्त रिकामे होणारे २ ड्रम इ. वस्तू शासनजमा करण्यात यावी. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0012

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) शाम अयोध्या यादव
२) टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ चा क्लिनर नवनाथ बाबुराव वाघमोडे
३) टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ चा चालक सुरेश पाटील
४) टँकर क्र. एमएच-४३-वाय-०५५९ चा मालक
५) मे. पिडीलाईट इंडस्ट्रिज लि., मुंबई
६) मे. पॅरामाऊंट ॲडेझीव्ह ॲप्स प्रा.लि. प्लॉट नं. ४८०२/२, जीआयडीसी, बलसाड, गुजरात

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा, कक्ष-१, वाशी, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) सिनीयर मॅनेजर, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि., ट्रॉम्बे डिस्पॅच युनिट, मुंबई रिफायनरी, माहुल, मुंबई ७४ (दुरध्वनी क्र. ०२२-२५५४३१५१/२५५४२९९०) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४०० ०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.